# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 119/2023 दिनांक : 22.03.2023

## 1)घरफोडी :—

**1)कुंटूर :—**दिनांक 17.03.2023 रोजी चे 17.00 ते दि. 19.03.2023 चे 18.00 वा. चे दरम्यान, **मौ. निळेगव्हाण ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने सोयाबीन ठेवलेल्या रूमचे कोणीतरी अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन आतील सोयाबीनचे 54 पोते प्रत्येकी पोत्यात 50 किलो असा एकुण 27 क्विंटल किंमती 1,08,000/—रूपयाचे सोयाबीनचे पोते चोरून नेले. वगैरे **फिर्यादी दत्ता व्यंकटी जाधव, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. निळेगव्हाण ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 50/2023 कलम 457, 380, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अटकोरे, मो.क्रं. 8669182128** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :—

**1)धर्माबाद :—** दिनांक 18.03.2023 रोजी 10.00 ते 13.40 वा. चे दरम्यान, **इनानी मिरची दुकान समोर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची मो.सा. क्रं एमएच—26/बीए—2058 किंमती 35,000/—रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी शेख कैसर शेख बाबुमियॉ, वय 30 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. शिवाजीनगर धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 55/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री आबेद, मो. क्रं. 9823027835** हे करीत आहेत.

## 3)कलम 380 चोरी :—

**1)बिलोली :—**दिनांक 13.03.2023 रोजी 24.00 ते दि. 17.03.2023 चे 13.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे माहेरघरी मौ. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे कपाटातील सोन्याच्या दागिन्याचा डबा किंमती 1,93,970/—रूपयाचा यातील नमुद आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी कल्पना भ्र. यादवराव लोकडे, वय 25 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सगरोळी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 42/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2049 आंबेवार, मो.क्र. 9423615449** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :—

**1)भाग्यनगर :—** दिनांक 19.03.2023 रोजी चे 22.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरा समोर मवाडे कॉम्पलेक्स सहयोग राजकॉर्नर नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे घरा समोर असतांना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून मागील भांडणाचे कारणावरून वाद करून आरोपीतांनी धारदार चाकुन फिर्यादीचे डोक्यावर वार करून गंभीर दुखापत केली, तसेच बरगडीवर लोखंडी रॉडने मारून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी विवेक जनार्धन मवाडे, वय 50 वर्षे, व्यवसाय नौकरी उपकार्यकारी अभियंता महावितरण तेलगाव उप विभाग जि. बिड ह. मु. मवाडे कॉम्पलेक्स सहयोगनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 118/2023 कलम 326, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** सपोनि/**वाठोरे मॅडम, मो.क्रं. 7709071326** हे करीत आहेत.

**2)तामसा :—** दिनांक 18.03.2023 रोजी चे 22.30 वा. चे सुमारास, **शिवाजीनगर तामसा ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन मंदीरावर फोटो का काढु देत नाही म्हणुन फिर्यादीचे घरात जबरदस्तीने घुसून शिवीगाळ करून लाथा बुक्यांनी मारहाण केली. फिर्यादीचे उजवे हातावर लाकडी बडग्याने मारून हात फॅक्चर केला व तोंडातील दोन दात पाडले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अशोक दिगांबर धरमुरे, वय 47 वर्षे व्यवसाय शेती रा. शिवाजीनगर तामसा ता. हदगांव जी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 21/2023 कलम 325, 451, 323, 504, 506, 143, 147, 148 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2498 कल्याणकर, मो.क्रं. 9284038840** हे करीत आहेत.

**3)धर्माबाद :–** दिनांक 19.03.2023 रोजी चे 06.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरा समोर आतकुर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे घरासमोर बसला असता यातील नमुद आरोपीने फिर्यादीस दारू पिण्यासाठी शंभर रूपये दे म्हनाला असता यातील फिर्यादीने तुला शंभर रूपये कुठून देऊ असे म्हणता आरोपीने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीचे डाव्या हाताच्या कोपऱ्याच्या बाजुला मारून डावा हात मोडला व थापड बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अशोक दिगांबर धरमुरे, वय 47 वर्षे व्यवसाय शेती रा. शिवाजीनगर तामसा ता. हदगांव जी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 36/2023 कलम 326, 451, 323, 504, 506, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पंतोजी, मो.क्रं. 9421761274** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)भोकर :–** दिनांक 15.03.2023 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **रा. हाश्मीनगर किनवट रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादी बाईस हुंडयासाठी शारिरीक व मानसीक छळ करून दिनांक 15.03.2023 रोजी 13.30 वा. चे दरम्यान फिर्यादीचे मोबाईलवर अश्लिील शिवीगाळ करून तीन वेळा तलाक तलाक तलाक असे म्हणुन आरोपी सोबत संसार करायचा असेल तर तुझे माहेरूहुन पाच लाख रूपये घेवून ये म्हणुन धमकी दिली.. वगैरे **फिर्यादी 31 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 95/2023 कलम 498(अ), 323, ,507, भादवी सह कलम 4 मुस्लीम महिला विवाहाच्या अधिकाराचे संरक्षण कायदा 2019 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री जाधव, मो.क्रं. 8605430645** हे करीत आहेत.

## 6)अवैध गुटखा बाळगला :–

**इतवारा :–** दिनांक 20.03.2023 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **आरोपीचे राहाते घरी मोसीन कॉलणी माळटेकडी रोड देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररित्या मानवी शरीरास अपायकारक असलेल्या राज्य शासनाने बंदी घातलेल्या पदार्थाची विवीध कंपणीचा गुटखा किंमती 5,80,038/–रुपयाचा मालासह चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/देविदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 91/2023 कलम 188, 272 ,273, 328 भादवी सह कलम 7, 20 सिगारेट व तंबाखु उत्पादने जाहीरात प्रतिबंध आणि व्यवहार व वाणिज्य पुरवठा व वितरण अधिनियम 2003 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री एम जी बेग, मो.क्रं. 8552031560** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)इतवारा :–** दिनांक 21.03.2023 रोजी चे 11.35 वा. चे सुमारास, **हॉटेल ताज समोर हबीब टॉकीज जवळ नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशीररीत्या कल्याण ओपन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1220/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1821, रसुल महेबब शेख, ने. इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 92/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1427 राठोड, मो.क्रं. 9764128102** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 20.03.2023 रोजी चे 22.15 वा. चे सुमारास, **नंदीग्राम सोसायटी जवळ कमानी समोर महाराणा प्रताप पुतळा ते बाफना रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद पाच ते सात आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1000/–रुपये एक होंडा शाईन मो सा किंमती 30,000/–रूपयाचे असा एकुण 31,000/–रूपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री भुषण बालासाहेब कांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 85/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/209 मंगनाळे, मो.क्रं. 8668296883** हे करीत आहेत.

**3)मुखेड :–** दिनांक 21.03.2023 रोजी चे 16.25 वा. चे सुमारास, **मौ. दापका राजा येथे पांडुरंग आत्माराम मोरे यांचे रिकाम्या प्लॉटमध्ये मौ. दापका राजा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 4960/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री किशोर बाबुराव बोधगीरे, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 74/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री वाघमारे, मो.क्रं. 9923481762** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड